# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dtemaharashtra.gov.in


अत्यंत महत्वाचे

जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०१९/ ३३८५

दिनांक : 20 NOV 2019

प्रति,

**प्राचार्य**

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/

विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या सफलता पोर्टलवर करण्याच्या प्रक्रियेबाबत. . . . . .**

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१९/८४९, दिनांक १८ नोव्हेंबर २०१९

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये झालेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश मान्यता संचालनालयामार्फत करण्यांत येणार आहे. या संदर्भात राज्यातील तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असणा-या जिल्हयातील शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांच्या प्राचार्यांना Regional District Officer म्हणुन संचालनालयामार्फत प्रवेश मान्यता प्रक्रियेसाठी प्राधिकृत करण्यांत आलेले आहे. सदर प्रक्रियेसाठी खालील प्रमाणे कार्यप्रणाली राबविण्यांत येणार आहे.

१. संचालनालयामार्फत Regional District Officer यांना लॉगीन आयडी व पासवर्ड देण्यात आलेला आहे. सदर Regional District Officer त्यांच्या संस्थेत सफलता पोर्टलवर संबंधीत जिल्हयातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश मान्यता प्रक्रिया करणार आहे.
२. यासाठी Regional District Officer यांनी त्यांच्या संस्था स्तरावर अधिव्याख्याता व कर्मचारी यांची समिती गठीत केली जाईल.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद मार्फत दि. ०१/११/२०१९ पासुन विभागाच्या अधिनस्त असणा-या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश मान्यता ऑफलाईन पध्दतीने तपासणी प्रक्रिया सुरु झालेली आहे. सदर प्रक्रियेनंतर संस्थांच्या प्रवेश मान्यता यादीतील त्रुटी संबंधीत संस्थांना कळविण्यात आलेल्या असुन, त्रुटींची पुर्तता करण्याची प्रक्रिया संस्थांमार्फत सुरु आहे.
४. Regional District Officer त्यांच्या जिल्हयातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्था यांना संपर्क करुन तपासणीसाठी वेळापत्रक देतील व त्रुटीच्या प्रकरणांबाबत पुर्तता केलेल्या कागदपत्रांसह संस्थांना तपासणीसाठी बोलावतील व प्रक्रिया पुर्ण करतील. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी ऑफलाईन पध्दतीने तपासलेल्या यादीतील विद्यार्थ्याच्या प्रवेशांना मान्यता दिलेली प्रकरणांची नोंद घेवुन सदर प्रकरणांना ऑनलाईन पध्दतीने अंतिमतः मान्यता देण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यता त्रुटींच्या प्रकरणांबाबत

संबधीत संस्थांच्या प्रतिनिधींनी सादर केलेले पुर्तता बाबतची कागदपत्रे तपासुन अंतिम मान्यता ऑनलाईन पध्दतीने देण्यात येईल. यानंतरही कांही त्रुटींची प्रकरणे शिल्लक राहिल्यास संबंधीत संस्थांना परत पुर्तता करण्यांच्या सूचना देऊन व पुनर्रतपासणी करुन ऑनलाईन पध्दतीने अंतिम मान्यता देण्यात येईल.

५. विलंबामुळे कांही संस्थांनी ऑफलाईन पध्दतीने प्रवेश गुणवत्ता पडताळणी यादी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचे कडुन तपासुन घेतली नसल्यास, अशा संस्थांची संपुर्ण यादी ऑफलाईन पध्दतीने संबंधीत जिल्हयाच्या Regional District Officer तर्फे तपासण्यात येईल व निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या प्रकरणाबाबत संस्थांनी पुर्तता केल्यानंतर, ऑनलाईन मान्यतेची प्रक्रिया पुर्ण करण्यांत येईल.

६. संस्थांच्या विद्यार्थ्यांची प्रवेश तपासणी प्रक्रिया पुर्ण करण्याची अंतिम तारीख **दि. १५ डिसेंबर २०१९ असेल.**

७. जिल्हयातील Regional District Officer व संस्थांची यादी सोबत जोडली आहे. सर्व संस्थांनी आपल्या जिल्हयातील संबंधीत Regional District Officer यांचेशी संपर्क करुन पुढील प्रक्रिया पुर्ण करावी.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

जिल्हानिहाय Regional District Officers व प्रवेश मान्यता प्राधिकृत संस्थांची यादी

| अ.क्र. | जिल्हा | Regional District Officer चे नांव | प्राधिकृत संस्था |
|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद |
| २ | जालना | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना | शासकीय तंत्रनिकेतन, नागेवाडी, जालना |
| ३. | परभणी | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर |
| ४. | हिंगोली | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली |
| ५. | नांदेड | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड |
| ६. | बीड | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, बीड | शासकीय तंत्रनिकेतन, बीड |
| ७. | लातूर | प्राचार्य, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, औसा रोड, लातूर |
| ८. | उस्मानाबाद | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद |